महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क विभाग,दुसरा मजला,
४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दुरध्वनी - २६४७ ४४ ३५ Website - www.msbve.gov.in Email : chairman-msbve@ nic.in

जा.क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.२०१७-१८/मुदतवाढ/२०१८/ ९३८ दिनांक :- ०४/०९/२०१८

प्रति,
जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, (सर्व)

विषय :- सहामाही / एक व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रम - प्रवेशास मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.एप्रिल-२०२०/४७४/२०१८, दिनांक २४/०५/२०१८
२. या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.जाने-२०१९/४७५/२०१८, दिनांक २४/०५/२०१८
३. या कार्यालयाचे पत्र क्र.मराव्यशिपमं/का-०४/परीक्षा/प्र.का.जुलै-२०१९/४७६/२०१८, दिनांक २४/०५/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, सहामाही, एक व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेश कार्यक्रम वरील संदर्भिय पत्रांनुसार यापूर्वीच आपणांस कळविण्यात आलेला अहे. आता सहामाही, एक व दोन वर्ष कालावधी अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेशास **दिनांक २९/०९/२०१८ पर्यंत** मुदतवाढ देण्यात येत असून खालील नमूद सुधारित कार्यक्रमाप्रमाणे मंडळास माहिती पाठविण्यात यावी.

| अ.क्र. | सुधारित प्रवेश कार्यक्रम | यापूर्वीचा दिनांक | सुधारित दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मंडळाच्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रम राबविणा-या संस्थांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे.<br>१. वार्षिक अभ्यासक्रमांसाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून **नियमित नोंदणी शुल्क** (रू. १००/-) सह नोंदणी अर्ज भरून घेणे.<br>२. **सहामाही** अभ्यासक्रमांसाठी संस्थेने विद्यार्थ्यांकडून **अतिविलंब शुल्क** रू. ५००/- प्रमाणे शुल्क आकारून नोंदणी /परीक्षा अर्ज भरून घेणे. | सहामाही अभ्यासक्रम - १८.०८.२०१८ पर्यंत<br><br>वार्षिक अभ्यासक्रम - ३१.०८.२०१८ पर्यंत | २९ सप्टेंबर, २०१८ पर्यंत |
| २ | संस्थेने प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट सी.डी. व हार्ड कॉपी तसेच नोंदणी शुल्क बँकेत भरलेल्या चलनाच्या मूळ प्रती व विद्यार्थ्यांच्या अभिलेखासह जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयात जमा करणे. आणि संस्थेने प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व चलनाच्या प्रती स्कॅन करून मंडळाच्या chairman-msbve@nic.in या ईमेल ॲड्रेसवर पाठविणे. | सहामाही अभ्यासक्रम - २४.०८.२०१८ पर्यंत<br><br>वार्षिक अभ्यासक्रम - ०७.०९.२०१८ पर्यंत | ०५ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांनी मंजूर केलेल्या याद्यांनुसार सर्व संस्थांची शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची एनरॉलमेंट सी.डी. आणि इतर बाबी मंडळ कार्यालयाकडे सादर करणे. | सहामाही अभ्यासक्रम - २९.०९.२०१८ पर्यंत | १५ ऑक्टोंबर, २०१८ पर्यंत |
| | | वार्षिक अभ्यासक्रम - २९.०९.२०१८ पर्यंत | |

मंडळाने यापूर्वी पाठविलेल्या प्रवेश कार्यक्रमांमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करून दि. १५.१०.२०१८ पर्यंत विद्यार्थ्यांची माहिती मंडळास सादर करण्यात यावी.

आपला,

(एस.के.वायदंडे)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

प्रत :-

१) मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
२) परीक्षा विभाग यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३) संगणक विभाग यांना मंडळाच्या वेबसाईटवर टाकणेसाठी.